
रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ३१६
www.ramprahar.com

मंगळवार, ३ जून २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## समृद्धी महामार्गाच्या शेवटच्या टप्प्याचे गुरुवारी लोकार्पण



**मुंबई :** नागपूर ते मुंबई विनाअडथळा प्रवास ५ जूनपासून करणे आता शक्य होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते समृद्धी महामार्गाच्या बहुप्रतीक्षित शेवटच्या टप्प्याचे इगतपुरी येथील सोहळ्यात लोकार्पण केले जाणार आहे. त्यामुळे आता या महामार्गाचा इगतपुरी ते आमने हा शेवटचा ७६ किलोमीटर लांबीचा मार्गही प्रवासी सेवेत दाखल होणार आहे, अशी माहिती राज्य रस्ते विकास महामंडळाचे (एमएसआरडीसी) व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांनी दिली. मुंबई ते नागपूर जलद प्रवासासाठी एमएसआरडीसीने ७०१ किलोमीटर लांबीच्या प्रवेशनियंत्रित महामार्गाची उभारणी केली आहे. आतापर्यंत त्यातील ६२५ किलोमीटर लांबीचा महामार्ग खुला झाला झाला आहे. आता गुरुवारपासून शेवटच्या टप्प्यातील महामार्ग खुला झाल्यानंतर नागपूर येथून निघालेल्या वाहनांना थेट मुंबईच्या वेशीवर आठ तासांत पोहचता येईल.

अंतरंग

'वॉटर टॅक्सीसाठी बंदरे विभागाने नियोजन करावे'/२
भारतीय जनता युवा मोर्चातर्फे पनवेलमध्ये रक्तदान उपक्रम/३
तरणखोप गावच्या हद्दीत बांगलादेशींना अटक/५

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण

### द्वारकाशारदापीठाधीश्वर शंकराचार्य सदानंद सरस्वती महाराजांनी दिले आशीर्वाद | सर्व स्तरांतून अभीष्टचिंतन, समाजोपयोगी उपक्रमांची रेलचेल





(अधिक छायाचित्रे पान ६,७,८ वर...)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

समाजाच्या हृदयात अधिराज्य गाजवणारे दानशूर व्यक्तिमत्त्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सोमवारी (दि. २) वयाची ७४ वर्षे पूर्ण करत ७५व्या अर्थात अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण केले. या मंगलसमयी सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, आध्यात्मिक, साहित्य, वैद्यकीय, सांस्कृतिक, विधी, कला, सांस्कृतिक, पत्रकारिता अशा विविध क्षेत्रातील असंख्य मान्यवर, कार्यकर्ते आणि नागरिकांनी त्यांचे अभीष्टचिंतन करून दीर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्या. विशेष म्हणजे द्वारकाशारदापीठाधीश्वर शंकराचार्य स्वामी श्री सदानंद सरस्वती महाराज यांनी स्वतः उपस्थित राहून लोकनेते रामशेठ ठाकूर व त्यांच्या कुटुंबाला आशीर्वाद दिले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव समितीच्या वतीने पनवेलमध्ये तीन दिवसीय भव्य अमृतमयी कीर्तन महोत्सव आयोजित करण्यात आला होता. यामध्ये भजन, कीर्तन, सामुदायिक हरिपाठ तसेच गुरूतुल्य कीर्तनकार महाराजांचा सन्मान समारंभपूर्वक करण्यात आला. या महोत्सवाला वारकरी संप्रदायातील हजारोंच्या संख्येने मंडळी उपस्थित राहिली, तर दहा हजारहून अधिक भाविकांनी या महोत्सवाचा लाभ घेतला.

वाढादिवसानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व अखिल भारतीय नाट्य परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय नाट्य महोत्सव आयोजित करण्यात आला तसेच रायगड जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन आणि योनेक्स सनराइज् यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्हा बॅडमिंटन चॅम्पियनशिप आणि निवड चाचणी स्पर्धा घेण्यात आली. कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेच्या वतीने एक कृतार्थ संध्याकाळ या साहित्यिक कार्यक्रमांतर्गत कविसंमेलन परिसंवाद, सन्मान पुरस्कार सोहळा, रायगड जिल्हा युवा मोर्चाच्या वतीने वर्षभर रक्तदान शिबिर उपक्रम आयोजित करण्यात असून जिल्ह्यातील रक्ततुटवडा भरून काढण्यासाठी हा एक विशेष उपक्रम हाती घेण्यात आला आहे. विविध विभागात वृक्षारोपण, आरोग्य शिबिरेही आयोजित करण्यात आली.

सर्वसामान्यांचे आधारवड असलेले लोकनेते रामशेठ ठाकूर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी हितचिंतकांची अफाट गर्दी जमली होती. या वेळी अनेक मान्यवरांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा वाढदिवस म्हणजे समाजाचा वाढदिवस असे गौरवोद्गार काढले.

# एटीएसची पडघ्यात कारवाई

## कुख्यात साकीब नाचणच्या घराची झाडाझडती

**भिवंडी : प्रतिनिधी**

राज्य दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) सोमवारी (दि.२) भिवंडी तालुक्यातील पडघा येथील बोरीवली गावात छापेमारी करून दिवसभर सर्च ऑपरेशन राबवले. या वेळी एटीएसने मुंबई बॉम्बस्फोटात सहभागी असलेला कुख्यात दहशतवादी साकीब नाचण याच्या घरासह गावातील अन्य घरांची झाडाझडती घेतली.



ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तान व अतिरेकी संघटनांशी संबंधित गद्दारांची देशभरात धरपकड सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई-ठाण्यासह राज्यभरात यापूर्वी पकडले गेलेले अतिरेकी व त्यांच्याशी संबंधित नेटवर्कची पाळेमुळे शोधण्यास पुन्हा एकदा केंद्रीय तपास यंत्रणांसह एटीएस पथकाने सुरवात केली आहे. याच कारवाई अंतर्गत सोमवारी पहाटे एटीएसच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पथकाने ठाणे ग्रामीण पोलिसांच्या मदतीने भिवंडी तालुक्यातील पडघा येथील बोरीवली गावात सर्च ऑपरेशन राबवले. या वेळी स्थानिक पोलिसांसह तीनशे ते साडेतीनशे पोलिसांच्या सुरक्षा छावणीत एटीएस पथकाने बोरीवली गावातील साकिब नाचणसह एकूण २२ घरांमध्ये सर्च ऑपरेशन करून तेथील संशयित व्यक्तींचे मोबाईल व लॅपटॉप तपासण्यात आले आहेत. या कारवाईवेळी अनेक मोबाईल व सिमकार्ड हे ताब्यात घेण्यात आले आहेत.

नाचण याला २००२ आणि २००३मध्ये झालेल्या साखळी बॉम्बस्फोटप्रकरणी अटक झाली होती. तो ठाणे कारागृहात होता. नाचण हा 'सिमी'चा सक्रिय सदस्य होता आणि २०१७मध्ये सुटका झाल्यानंतर तो 'आयसिस'मध्ये सामील झाला. डिसेंबर २०२३मध्ये बोरीवली गावात नाचणच्या घरावर आणि इतर १४ आरोपींच्या परिसरात एनआयएने टाकलेल्या छाप्यांमध्ये मोठ्या प्रमाणात शस्त्रे, दारूगोळा, धारदार शस्त्रे आणि रोख रक्कम जप्त करण्यात आली होती.

## 'नीट' परीक्षा पुढे ढकलली

**नवी दिल्ली** : नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन इन मेडिकल सायन्सने येत्या १५ जून रोजी होणारी नीट पीजी २०२५ परीक्षा पुढे ढकलली. ही परीक्षा दोन शिफ्टमध्ये न घेता एकाच शिफ्टमध्ये घ्या, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने एनबीईएमएस दिले होते. त्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. परीक्षेची पुढील तारीख लवकरच जाहीर केली जाईल.

## जेईई अ‍ॅडव्हान्स परीक्षेचा निकाल जाहीर

### रजित गुप्ता देशात अव्वल; मुंबईतून तिघे 'टॉप १०'मध्ये

**मुंबई : प्रतिनिधी**

देशातील सर्वोच्च अभियांत्रिकी संस्थांमध्ये प्रवेश घेण्यासाठी घेण्यात येणाऱ्या जेईई अ‍ॅडव्हान्स्ड २०२५चा निकाल सोमवारी (दि. २) जाहीर झाला. राजस्थानमधील कोटाचा विद्यार्थी रजित गुप्ता याने ऑल इंडिया रँक १ मिळवून संपूर्ण देशात अव्वल स्थान पटकावले आहे.

या वर्षी ही परीक्षा आयआयटी कानपूरने आयोजित केली होती. रजितसोबत कोटातील आणखी चार विद्यार्थ्यांनी टॉपर लिस्टमध्ये आपले स्थान निर्माण केले आहे, ज्यामुळे कोटामध्ये उत्सवाचे वातावरण आहे.

या परीक्षेमध्ये मुंबई विभागातून तीन विद्यार्थी 'टॉप १०'मध्ये आले आहेत. रँक ३ माजिद हुसेन, रँक ४ पार्थ वर्तक, रँक ७ साहिल देव असे हे तीन विद्यार्थी आहेत.

## निवडक

### लष्करी छावणीवर भूस्खलन; तिघांचा मृत्यू, नऊ जवान बेपत्ता

**गंगटोक** : ईशान्य भारतातील राज्यांमध्ये पाऊस आणि भूस्खलनाने हाहाकार माजवला आहे. अशातच सिक्कीममधील चट्टन येथील लष्करी छावणीत रविवारी (दि. १) संध्याकाळी झालेल्या भूस्खलनात काही सैनिकांसह तीन जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली असून नऊ जवान बेपत्ता आहेत. त्यांचा शोध घेतला जात आहे. दरम्यान, भूस्खलनामुळे दोन्ही बाजूंनी रस्ते बंद करण्यात आले आहेत.

### राजीव शुक्ला होणार बीसीसीआयचे अध्यक्ष

**नवी दिल्ली** : भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) ज्येष्ठ पदाधिकारी आणि विद्यमान उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांच्याकडे बीसीसीआयचे अंतरिम अध्यक्षपद येणार आहे. भारताचे माजी क्रिकेटपटू रॉजर बिन्नी यांना वयोमर्यादेच्या नियमामुळे राजीनामा द्यावा लागणार आहे. शुक्ला त्यांच्याकडून लवकरच पदभार स्वीकारतील. अध्यक्षपदाची पुढील निवडणूक सप्टेंबर २०२५मध्ये होणार असून शुक्ला तीन महिने या पदावर असतील.

# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर मराठी माध्यम विद्यालयाच्या इमारतीचे भूमिपूजन

### उलवे पुष्पक नोडमध्ये सोहळा; 'रयत'चे व्हाईस चेअरमन अ‍ॅड. भगीरथ शिंदे यांच्यासह अनेक मान्यवरांची लाभली उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे पुष्पक नोडमध्ये रयत शिक्षण संस्थेच्या सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर मराठी माध्यम विद्यालयाची उभारणी करण्यात येत असून या इमारतीचा भूमिपूजन सोहळा शकुंतला ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रविवारी (दि. १) झाला. 'रयत'चे व्हाईस चेअरमन अ‍ॅड. भगीरथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर व त्यांची पत्नी शकुंतला ठाकूर यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले.



सेक्टर २४मधील प्लॉट क्रमांक २४० येथे झालेल्या या भूमिपूजन सोहळ्यास आमदार प्रशांत ठाकूर, वर्षा प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, अर्चना परेश ठाकूर, अमोघ ठाकूर, आदेश ठाकूर, अपूर्व ठाकूर, आदित्य ठाकूर यांच्यासह ठाकूर कुटुंबीय उपस्थित होते. या वेळी उपस्थितांनी शकुंतला रामशेठ ठाकूर यांचे अभीष्टचिंतन करून त्यांना निरोगी आणि दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या वेळी रयत शिक्षण संस्थेचे व्हाईस चेअरमन अ‍ॅड. भगीरथ शिंदे म्हणाले की, समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करणाऱ्या व्यक्ती वेळोवेळी पुढे येत असतात, पण समाज बदलायचा असेल, शिक्षणात गुणवत्तेचा पाया घालायचा असेल, तर फक्त काम करणं पुरेसे नसते. त्यामागे दूरदृष्टी, कल्पकता आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांची जोड लागते. अशा गुणवत्तेचा संगम म्हणजेच लोकनेते रामशेठ ठाकूर. त्यांनी समाजहिताचे भान ठेवून, पुढील पिढ्यांच्या भविष्याचा विचार करून आपल्या कार्याला नेहमी व्यापक आणि शाश्वत दिशा दिली. त्यांच्या कार्याची खरी ओळख म्हणजे शिक्षण क्षेत्रात त्यांनी उभारलेली ज्ञानमंदिरे आहेत.

रयत शिक्षण संस्था ही लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सामाजिक दृष्टिकोनाची आणि शैक्षणिक बांधिलकीची साक्ष देणारी संस्था आहे. या संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण तसेच शहरी भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, आधुनिक सुविधा, आणि संधी उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले आहेत. शाळा, महाविद्यालये, वसतिगृहे, क्रीडा व सांस्कृतिक सुविधा या साऱ्यांचा समावेश असलेल्या शैक्षणिक संकुलांची उभारणी हे त्यांच्या कार्याचे मूर्त स्वरूप आहे, असे सांगून अ‍ॅड. शिंदे पुढे म्हणाले की, **(पान २ वर..)**

> **आज रामशेठ ठाकूर यांचे नाव उच्चारले की, एक कणखर नेतृत्व, सामाजिक बांधिलकीची जाण आणि परिवर्तनाची आस असलेले व्यक्तिमत्व डोळ्यांसमोर उभे राहते. त्यांचे कार्य आजच्या आणि उद्याच्या पिढ्यांसाठी प्रेरणास्रोत आहे.**
> **–अ‍ॅड. भगीरथ शिंदे, व्हाईस चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा**

# रायगडावर उत्खननात सापडले खगोलशास्त्रीय उपकरण

**महाड : प्रतिनिधी**

दुर्गराज रायगड येथे भारतीय पुरातत्व विभाग आणि रायगड विकास प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या उत्खनन प्रक्रियेमध्ये 'यंत्रराज सौम्ययंत्र' हे खगोलशास्त्रीय उपकरण सापडले आहे. रायगड विकास प्राधिकरणचे अध्यक्ष संभाजीराजे छत्रपती यांनी सोशल मीडियावरून ही माहिती जाहीर केली.

गेल्या तीन ते चार वर्षापासून रायगडाच्या रोपवे अप्पर स्टेशनची मागील बाजू, कुशावर्त तलाव, बाजारपेठ, जगदीश्वर मंदिर या भागांमध्ये जे शिवकालीन वाड्यांचे अवशेष आहेत, अशा जवळपास १० ते १२ विविध ठिकाणी हे उत्खनन सुरू होते. कुशावर्त तलावाच्या वरील भागात तसेच पर्जन्यमापक आणि वाडेश्वर मंदिराच्या मध्य भागात असलेल्या ऐतिहासिक वाड्याच्या जागेवर उत्खनन करताना यंत्रराज सौम्ययंत्र खगोलशास्त्रीय उपकरण सापडले.



या यंत्राच्या वरील बाजूस काही अक्षरे कोरलेली आहेत. मध्यभागी एक कासव, सापासारख्या दोन प्राण्यांचे छाप आहेत. त्यांचे मुख व शेपटी कुठल्या दिशेला असावी हे समजण्यासाठी वरील बाजूस मुख आणि पूंछ अशी अक्षरेसुद्धा कोरलेली आहेत. यावरून उत्तर आणि दक्षिण दिशा कुठे असावी याचा अंदाज बांधला जात असेल.

प्राचीन कालखंडापासून ग्रह-ताऱ्यांच्या अभ्यासासाठी, दिशांचा वेध घेण्यासाठी तसेच वेळ मोजण्यासाठी अस्ट्रोलॅब म्हणजे हे खगोलशास्त्रीय उपकरण वापरले जात होते. विशेषतः अक्षांश, रेखांश, कर्कवृत्त, विषुववृत्त यांसारख्या गोष्टींचा अभ्यास करणे यामुळे सोपे जात असे. रायगडाचे बांधकाम करताना शास्त्रोक्त पद्धतीचा वापर झाल्याचा महत्त्वाचा पुरावा उत्खननामध्ये समोर आला आहे.

> **संशोधनासाठी मोठी संधी**
>
> **'यंत्रराज सौम्ययंत्र' हे खगोलशास्त्रीय उपकरण २०१८च्या उत्खननात सापडले असून नुकतेच ते रायगड विकास प्राधिकरणचे अध्यक्ष संभाजीराजे छत्रपती यांनी प्रसिद्ध केले आहे. या अमूल्य ठेवल्यामुळे इतिहास अभ्यासकांना पुढील संशोधनासाठी मोठी संधी उपलब्ध झाली आहे. रायगडावरील उत्खननात सापडलेल्या सर्व प्राचीन गोष्टी पुरातत्व विभागाने संशोधनानंतर सार्वजनिक कराव्यात, अशी मागणी शिवप्रेमींकडून होत आहे.**

## आरसीबी वि. पंजाब किंग्ज यांच्यात आज आयपीएल फायनल

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

यंदा नवा आयपीएल विजेता संघ मिळणार आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि पंजाब किंग्ज हे संघ प्रथमच स्पर्धेचे जेतेपद पटकावण्यासाठी मंगळवारी (दि.३) एकमेकांविरूद्ध भिडणार आहेत. अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर हा सामना होईल.

पहिल्या क्वालिफायर सामन्यात हे दोन्ही संघ भिडले होते. जिथे आरसीबीने पंजाबला पराभूत करीत अंतिम फेरी गाठली, तर पंजाब किंग्सचा संघ दुसऱ्या क्वालिफायरमध्ये मुंबई इंडियन्सविरूद्ध तीन विकेट्सने विजय मिळवत अंतिम फेरीत स्थान मिळवले आहे. आता फायनल होईल.

### सर्वात मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेचा निकाल जाहीर

# 'हंस', 'इंद्रधनु' ठरले सर्वोत्कृष्ट

**मुंबई : प्रतिनिधी**

विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या २४व्या राज्यस्तरीय व रायगड जिल्हास्तरीय सर्वात मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेचा निकाल जाहीर झाला आहे.

एक लाख रुपये व सन्मानचिन्ह असलेला सर्वोत्कृष्ट राज्यस्तरीय दिवाळी अंकाचा पुरस्कार 'हंस' अंकासाठी देण्यात येणार आहे, तर रायगड जिल्ह्यास्तरीय प्रथम पारितोषिक इंद्रधनु अंकाने पटकाविले असून चाळीस हजार रुपये आणि सन्मानचिन्हाने त्यांना गौरविण्यात येणार आहे.

दिवाळी अंक महाराष्ट्राची पूर्वापार चालत आलेली एक सांस्कतिक परंपरा आहे. ही परंपरा अखंडपणे चालू राहावी व त्यातून दर्जेदार दिवाळी अंकांची निर्मिती व्हावी यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेले श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ तसेच मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या वतीने गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. या वेळची ही २४वी स्पर्धा आहे.

राज्यभरातून उदंड प्रतिसाद लाभलेल्या या स्पर्धेसाठी ज्येष्ठ साहित्यिक प्रा. अविनाश कोल्हे, महाराष्ट्र सेवा संघ मुलुंडचे कार्यवाह अरूण भंडारे आणि सुप्रसिद्ध सुलेखनकार सुनील धोपावकर यांनी परीक्षक म्हणून जबाबदारी बजावली. स्पर्धेचे मुख्य समन्वयक म्हणून मुंबई मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष शैलेंद्र शिर्के यांनी, तर रायगड जिल्ह्यातील स्पर्धेचे समन्वयक म्हणून संघाचे ज्येष्ठ सदस्य दीपक म्हात्रे यांनी काम पाहिले. स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा लवकरच मान्यवरांच्या उपस्थितीत होईल, असे पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी कळविले आहे. **(पान २ वर..)**

# वॉटर टॅक्सीसाठी बंदरे विभागाने नियोजन करावे

## मंत्री नितेश राणेंकडून बैठकीत सूचना

**मुंबई : प्रतिनिधी**

गेट वे ऑफ इंडिया येथील रेडिओ जेट्टी ते नवी मुंबई विमानतळ येथे वॉटर टॅक्सी सुरू करण्याचा प्रस्ताव आहे. यासाठी बंदरे विभागाने याबाबतचे नियोजन पूर्ण करावे. तसेच गरजेच्या ठिकाणी जेट्टी उभारण्यासाठी प्रस्ताव तयार करावेत, अशा सूचना मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिल्या.



वॉटर टॅक्सी सुरू करण्याबाबत मंत्रालयात बैठक संपन्न झाली. त्यावेळी मंत्री राणे बोलत होते. बैठकीस परिवहन, बंदरे आणि हवाई वाहतूक विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, नवी मुंबई विमानतळ प्राधिकरणाचे ब्रिजेश सिंघल, महाराष्ट्र सागरी मंडळाचे प्रदीप बढीये यांच्यासह विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

मंत्री राणे म्हणाले, वॉटर टॅक्सी सुरू करण्यासाठी टर्मिनल उभारणी टप्प्याटप्प्याने सुरू करावी. तसेच यासाठी विमानतळ प्राधिकरणाने आवश्यक परवानग्यांसाठी प्रस्ताव सादर करावेत. माल वाहतुकीसाठीही जेट्टी उभारण्यासाठी ठिकाणे निश्चित करावीत. मुंबईतील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी राज्य सरकारने जलवाहतुकीच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

नवीन वॉटर टॅक्सी सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला असून, यामुळे मुंबई आणि नवी मुंबईतील प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होईल. या सेवेमुळे नवी मुंबईतील विविध भाग मुंबईशी जोडला जाईल. प्रवासाची वेळ सुमारे ४० मिनिटे असणार आहे. या वॉटर टॅक्सी सेवांमध्ये इलेक्ट्रिक बोट्सचा वापर केल्यामुळे प्रदूषण कमी होईल आणि पर्यावरणाला फायदा होईल. तसेच मुंबईतील वाहतूक कोंडी कमी होईल आणि प्रवाशांना आरामदायक प्रवासाचा अनुभव मिळेल, असेही मंत्री राणे यांनी सांगितले.

# अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया नोंदणीसाठी मुदतवाढ

**मुंबई : प्रतिनिधी**

इयत्ता ११वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०२५-२६ अंतर्गत विद्यार्थी नोंदणीसाठी दिनांक २६ मे २०२५ ते ३ जून २०२५ हा कालावधी देण्यात आला होता. ६ मे २०२५ च्या शासन निर्णयातील तरतुदीबाबत काही सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्यानुसार इयत्ता अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये महाविद्यालयातील इन-हाऊस कोट्यातील जागा भरण्यासाठी आवश्यक बदलाबाबत शासनाने ३१ मे रोजीच्या पत्रान्वये आदेश दिले असल्याने आता या प्रवेश प्रक्रियेच्या नोंदणीसाठी ५ जून रोजी दुपारी २ वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात येत असल्याचे प्र. शिक्षण संचालक (माध्यमिक) डॉ.श्रीराम पानझाडे यांनी कळविले आहे.

या पत्रानुसार इन-हाऊस कोट्याअंतर्गत खासगी व्यवस्थापनाच्या उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांना १० टक्के जागा आरक्षित असतील. मुंबई शहर, मुंबई उपनगर व ठाणे या क्षेत्रातील उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय/ वरिष्ठ महाविद्यालय संलग्नित संस्थांच्या शाळाकरीता एक युनिट ग्राह्य धरण्यात येत आहे. राज्यातील उर्वरित जिल्ह्यांकरीता त्याच संस्थेची शाळा व उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय/ वरिष्ठ महाविद्यालय यासाठी महसूली जिल्ह्यांमध्ये एक यूनिट इन-हाऊस कोट्यासाठी ग्राह्य धरण्यात येत आहे.

# तळोजा पोलिसांनी आठ लाखांचा मुद्देमाल मालकांकडे केला सुपूर्द

## ४८ मोबाईलसह एका लॅपटॉपचा समावेश



**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई पोलीस आयुक्तलाया अंतर्गत सीईआयआर पोर्टलचा प्रभावीप्रणे वापर करुन तांत्रिक तपासादरम्यान ४८ मोबाईल व एक लॅपटॉप असा एकुण आठ लाख पाच हजार किंमतीचा मुद्देमाल केला हस्तगत करुन मुळ मालकांना हस्तांतर केला.

पोलीस आयुक्त मिलिंद भांरबे, अप्पर पोलीस आयुक्त संजय येनपुरे, पोलीस उपायुक्त परिमंडळ ०२ प्रशांत मोहीते. सहा. पोलीस आयुक्त पनवेल विभाग अशोक राजपुत यांचे मार्गदर्शनाने तळोजा पोलीस ठाणे हद्दीत हरवलेले मोबाईल फोन याबाबतची तक्रार नोंदविण्या करीता नागरिकांना भारत सरकारव्दारे सीईआयआर पोर्टल सुरु करण्यात आले.

तळोजा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रविण भगत, पोलीस निरीक्षक (गुन्हे) सागर निकम यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे पोलीस उप निरीक्षक ज्ञानोबा धुळगंडे, हवालदार विनोद डुंबरे पाटील, शिपाई सचिन माने, हवालदार नैनेश पाटील, दिपक सावंत, अजय मढवी, शंकर शिंदे, शिपाई राजेश उगाडे, अनिल जाधव यांनी विविध राज्यातुन आतापर्यंत एकुण आठ लाख पाच हजार रुपये किंमतीचे ४८ मोबाईल फोन व एक लॅपटॉप हस्तगत केला होता.

हस्तगत मोबाईल फोन व लॅपटॉप मुळ मालकांना पोलीस ठाण्यात बोलावुन वपोनि प्रवीण भगत यांच्या हस्ते सन्मानपुर्वक परत केला आहे. मोबाईल व लॅपटॉप परत मिळाल्याबद्दल नागरिकांनी पोलीसांचे आभार व्यक्त करुन मनापासून कौतुक केले.

# उलवे येथे आरोग्य तपासणी शिबिर





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील दानशूर व्यक्तीमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रम राबवून मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. त्याअंतर्गत भारतीय जनता पक्ष आणि राम मंदिर कमिटी उलवे नोड यांच्यावतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे अयाोजन रविवारी (दि.१) करण्यात आले होते. या शिबिराला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट दिली.



या शिबिराला नागरीकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून शिबीरामध्ये नेत्र तपासणी, महिलासाठी स्त्रीरोग तज्ज्ञांकडून तपासणी, दिव्य वेलनेस व फिटनेस सेटरच्यावतीने नागरीकांची तपासणी करण्यात आली. या वेळी वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, भाजपनेते मदन पाटील, प्रवीण ठाकूर, निलेश खोत, संतोष तुडमे, ओमकार कोळी, नामदेव ठाकूर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. या वेळी अनेक मान्यवरांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिष्टचिंतन केले.

# मयत व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध

**पनवेल :** धानसर टोल नाक्याजवळ एका कोरड्या नाल्यामध्ये एका बेवारस २५ ते ३० वर्षीय युवकाचा मृतदेह आढळला आहे. मयत व्यक्तीची उंची पाच फूट सहा इंच, रंग सावळा, चेहरा उभट असून अंगात सफेद टि शर्ट, सफेद बर्मुडा आहे. या व्यक्तीचा मृतदेह दुर्गंधी येत असलेल्या अवस्थेत मिळून आला. या व्यक्तीच्या नातेवाईकांना तळोजा पोलिसांनी संपर्क करण्याचे आवाहन केले आहे.



**उरण : येथीलबाजारपेठेतील ममता ज्वेलर्सचे आमदार महेश बालदी यांच्या हस्ते उद्घाटन झाले. या वेळी अभिनेता गोवर्धन आसरानी, ज्वेलर्सचे मालक शिवसिंह खरवड, भाजपचे नेते रवी भोईर, कौशिक शाह, महेंद्रसिंह, सागरसिंह, दर्शन झांजरा, योगेश पालेवाल, डी.एल. पालेवाल, रूपसिंह दसाना, जोधपुरचे उद्योगपती नरेश झांजरा, सरपंच केशरसिंह खरवड आदी उपस्थित होते.**

# विद्युत सुरक्षेबाबत जनजागृती कार्यक्रम




**मुंबई : प्रतिनिधी**

महावितरणच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने 'शुन्य अपघात महावितरण, शुन्य अपघात महाराष्ट्र' ही संकल्पना घेऊन १ ते ६ जून २०२५ या कालावधीत संपूर्ण राज्यात विद्युत सुरक्षा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. २ जून २०२५ रोजी रहिवासी परिसरात विद्युत सुरक्षाविषयी जनजागृती कार्यक्रम राबविण्याचे योजिले होते. त्याप्रमाणे, भांडूप परिमंडलातील ठाणे, वाशी व पेण मंडळातील प्रत्येक विभागीय कार्यालयांतर्गत विविध ठिकाणी विद्युत सुरक्षा बाबत जनजागृती कार्यक्रम करण्यात आले व सदर कार्यक्रमाला ग्राहकांनी उत्तम प्रतिसाद दिला आहे.

दैनंदिन जीवनात विजेशिवाय काम करता येत नाही. वीज वापराचे प्रमाण शहरी भाग तसेच ग्रामीण भागातही वाढत चालले आहे. आजच्या काळात, वीज ही मूलभूत गरज बनली आहे. शहरापासून ते ग्रामीण भागापर्यंत विजेपासून होणाऱ्या अपघातांच्या घटना पाहता अधिक सतर्कतेने व सुरक्षितपणे विजेचा वापर करणे अत्यंत आवश्यक आहे म्हणून विद्युत सुरक्षा सप्ताहाच्या निमित्ताने महावितरणच्या सर्व परिमंडलात आज २ जून २०२५ रोजी विद्युत सुरक्षा बाबत जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आले.

रहिवासी परिसरात जसे कि गृहनिर्माण संस्था, बाजारपेठेत तसेच सार्वजनिक ठिकाणी जनजागृती करून ग्राहकांना विद्युत यंत्रणा हाताळताना घ्यावायचे विद्युत उपकरणे वापरताना आवश्यक ती खबरदारी कशी घ्यावी हे समजावून सांगितले.

पान १ वरुन

## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर मराठी माध्यम विद्यालयाच्या इमारतीचे भूमिपूजन

रामशेठ ठाकूर यांचा उद्देश नेहमी स्पष्ट राहिला आहे. त्यामुळे त्यांनी शिक्षणासाठी केवळ इमारती उभारल्या नाहीत, तर मूल्याधिष्ठित शिक्षण देणाऱ्या संस्था घडवल्या. त्यांच्या कार्याने हजारो विद्यार्थी घडले, अनेक कुटुंबांचे जीवनमान उंचावले आणि संपूर्ण समाजात सकारात्मक बदलांची नांदी घडवून आली.

सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेचे माध्यमिक विभागाचे सहसचिव बंडू पवार, जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, ओबीसी सेलचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ, माजी नगरसेविका दर्शना भोईर, माजी पं.स. सदस्य रत्नप्रभा घरत, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यकारिणी सदस्य संजय भगत, विभागीय अध्यक्ष विजय घरत, अमर म्हात्रे, सुधीर ठाकूर, भार्गव ठाकूर, न्हावे सरपंच विजेंद्र पाटील, चंद्रकांत भोईर, स्वप्नील ठाकूर, ज्योत्स्ना ठाकूर, योगिया भगत, अनंता ठाकूर, जयवंत देशमुख, अरुण घरत, निलेश खारकर, मुख्याध्यापक दीपक भर्णूके, मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर, विभागीय पीआरओ बाळासाहेब कारंडे, संतोष गुजर, मांडवी गुरूजी, राजेश खारकर, किशोर पाटील, शैलेश भगत, मीनाक्षी पाटील, निकिता खारकर, सपना पाटील, गणेश सोमासे, रूपेश मोहिते, रंजना घरत, रंजना पाटील, जागृती म्हात्रे, यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, शिक्षक, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शकुंतला ठाकूर या थोर समाजसुधारक जनार्दन भगत यांच्या कन्या असून लोकनेते रामशेठ ठाकूर यांना अर्धांगिनी म्हणून त्यांची सामाजिक कार्यात भक्कम साथ लाभली आहे. सामाजिक बांधिलकीचा वारसा जपत या दाम्पत्याने समाजसेवा हाच जीवनधर्म मानला आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी गोरगरीब व वंचित मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी सदैव प्रयत्नशील राहून शिक्षण क्षेत्रात आपले अमूल्य योगदान दिले आहे. त्यांच्या पुढाकाराने व मार्गदर्शनाखाली जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था ही एक उत्कृष्ट शैक्षणिक संस्था बनली आहे. तरीसुद्धा त्यांच्या मनात आजही मातृसंस्था रयत शिक्षण संस्थेबद्दल अतूट प्रेम आणि निष्ठा आहे. सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर मराठी माध्यम विद्यालयाची स्थापना हे रयत शिक्षण संस्थेच्या विस्तारात एक महत्त्वाचे पाऊल आहे. या ठिकाणी सीबीसीई माध्यमाचे विद्यालय आहे, परंतु काही कुटुंबातील विद्यार्थ्यांचा कल मराठी माध्यमाकडे असतो. त्यामुळे या भागात मराठी माध्यमाच्या शाळेची आवश्यकता होती हे लक्षात घेऊन संस्थेने मराठी माध्यमाचे विद्यालय उभारण्याचा निर्णय घेतला.

उलवे नोडसारख्या वेगाने विकसित होत असलेल्या भागात गुणवत्तापूर्ण मराठी माध्यम शिक्षणाची गरज लक्षात घेऊन हे विद्यालय उभारण्यात येत आहे. या विद्यालयाच्या स्थापनेमुळे परिसरातील विद्यार्थ्यांना मातृभाषेत शिक्षण घेण्याची उत्तम संधी उपलब्ध होणार आहे. शिक्षणाबरोबरच संस्कार, मूल्यशिक्षण आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा संगम साधणारे हे विद्यालय असणार आहे.

## सर्वात मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेचा निकाल जाहीर

**राज्यस्तरीय निकाल :-** सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक-हंस, द्वितीय पारितोषिक-अंतरीचे प्रतिबिंब, तृतीय पारितोषिक-अक्षर, सर्वोत्कृष्ट विशेषांक-नवभारत, दृश्य कला विशेषांक; मुलांसाठी सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक-वयम, उत्तेजनार्थ-छावा, उत्कृष्ट दिवाळी अंक-कालनिर्णय, सर्वोत्कृष्ट कथा-सत्याग्रह, मिलिंद बोकील (दीपावली), उत्कृष्ट कविता-आजकाल बायकाही..., लक्ष्मी यादव, पुरुष स्पंदन (७६); लक्षवेधी परिसंवाद-असहमतीचा आवाज, ऋतूरंग; लक्षवेधी मुलाखत-डॉ. सुनील लवटे, शब्दशिवार, इंदूमती गोंधळे; सर्वोत्कृष्ट मुखपृष्ठ-उत्तम अनुवाद, सर्वोत्कृष्ट व्यंगचित्रकार-प्रभाकर वाईरकर, शब्द रूची; सर्वोत्कृष्ट डिजिटल अंक-विवेक मेहेत्रे, 'उद्वेली-ऑल दि बेस्ट २०२४'; विशेष लेख-राजकारण की टोळीयुद्ध, आर्याबाग, विनय हर्डीकर.

**रायगड जिल्हास्तरीय निकाल :-** सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक-इंद्रधनु, द्वितीय पारितोषिक-आगरी दर्पण, तृतीय पारितोषिक-शब्दसंवाद, उत्तेजनार्थ-लोकसेवक, साहित्य आभा, उत्कृष्ट कथा-रेखा नाबर, लोकसेवक, जिथे कमी तिथे मी; उत्कृष्ट कविता-हितवर्धक, कवी गणपत म्हात्रे, उत्कृष्ट व्यंगचित्रकार-विवेक मेहेत्रे, साहित्य आभा.

# लोखंडी सळ्या चोरणाऱ्यांना रंगेहाथ अटक

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा परिसरात वाहनांमधील तसेच स्टील सळ्यांचा मुद्देमाल परस्पर अफरातफर करून चोरी करणाऱ्या टोळीच्या पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहेत. यामधील प्रमुख आरोपी इम्तियाज शेखसह नऊ जणांवर तळोजा पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना तळोजा एमआयडीसी परिसरात घडली.

याप्रकरणी ओमप्रकाश चौधरी, मैफूज अहमद खान, निजाम अली, रुद्रप्रसाद चौधरी, जलाउद्दीन खान, संतोष कुलबुल गौतम, माशूक अली अन्सारी, मोहम्मद अली, इम्तियाज, सरफराज हजरत व दोन अनोळखी इसमांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आशिया खंडातील सर्वात मोठे स्टील मार्केट म्हणून कळंबोली स्टील मार्केट परिसराकडे पाहिले जाते. या परिसरात अनेक प्रकारचे गुन्हे वारंवार घडत आहेत. वाहनचोरी, गोडाऊनमधून मुद्देमाल चोरणे तसेच अवजड वाहनांतील स्टील लोखंडी सळ्या कॉइल यांसारखा मुद्देमाल परस्पर रातोरात चोरून काळाबाजार करण्याचे प्रकार पुन्हा एकदा समोर आले आहेत. तळोजा एमआयडीसी परिसरातील रतन मोटर कंपनीसमोर तळोजातील पोलीस कर्मचारी गुन्हे प्रकटीकरण पथकामध्ये कार्यरत असलेले गुरुनाथ भुंडेरे हे परिसरात गस्त घालत होते.

दरम्यान, तळोजातील रतन मोटर कंपनीच्या परिसरात वाहनांतील लोखंडी सळ्या मुद्देमालाचा अपहार करून एका वाहनातून दुसर्या वाहनांमध्ये या सळ्या भरल्या जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्या ठिकाणी घटनास्थळी जाऊन पोलिसांनी पाहणी केली असता हा संपूर्ण प्रकार उघड झाला.

या वेळी पोलीस उपनिरीक्षक मराठे पोलीस हवालदार धीरज पाटील, खैरनार, पोलीस नाईक शिंदे, पोलीस शिपाई म्हस्के, पोलीस शिपाई जाधव यांच्या पथकाने परिसरात जाऊन रंगेहात पकडले. या संपूर्ण प्रकाराची चौकशी केल्यानंतर अशी निर्दशनास आले की, या ठिकाणी अजून भरलेल्या सळ्यांच्या गाड्या येऊन उभे राहत आहेत. सुरू असलेल्या प्रकाराबाबत पोलिसांनी संपूर्ण चौकशी केली असता सदर मुद्देमालाचे कोणते कागदपत्र आढळून आले नाहीत.

# तरुणाची ऑनलाईन लूट

**पनवेल : वार्ताहर**

मर्चंट नेव्हीमध्ये काम करणाऱ्या एका तरुणाची ऑनलाइन लूट झाली आहे. त्याच्याकडून तीन दिवसांत १९ लाख ११ हजार रुपयांची रक्कम भामट्यांनी उकळली आहे. याबाबत कळंबोली पोलीस अधिक तपास करीत आहेत.

कळंबोली राहणारा तरुण मर्चंट नेव्हीमध्ये नोकरी करतो. नुकताच त्याचे काम संपल्यामुळे त्याने पुन्हा नवीन कामासाठी अर्ज करत प्रक्रिया सुरू केली होती. या दरम्यान त्याला घरबसल्या संगणकावर काम करून उत्पन्न मिळविण्याची जाहिरात इंटरनेटवर दिसली. त्यामुळे आमिषाला बळी पडल्याने तरुणाने स्वतःकडची मोठी रक्कम या कामामध्ये गुंतवली. ही गुंतवलेली रक्कम परत न मिळाल्याने तरुणाने कळंबोली पोलिसांत धाव घेत दाद मागितली.



## निवडक

### कुणाल लोंढे यांची सचिवपदी निवड



**पनवेल :** करंजाडे येथील पोलीस पाटील कुणाल लोंढे यांची रायगड जिल्हा सचिव पदी पुन्हा निवड झाली आहे. रायगड जिल्हा पोलीस पाटील संघाची बैठक अलिबाग येथे राज्याध्यक्ष महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघ बाळासाहेब शिंदे पाटील यांच्या उपस्थितीत सर्वांच्या रायगड जिल्हा पोलीस पाटील संघांची कार्यकारिणीची निवड करण्यात आली. या वेळी रायगड जिल्हा सचिव पदी दुसऱ्यादा आयु.कुणाल लोंढे करंजाडे पोलीस पाटील यांची नियुक्ती करण्यात आली. याबाबदल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

### मोबाईल हिसकावून चोरटे पसार

**पनवेल** : रस्ता ओलांडत असताना मोटरसायकलवरून आलेल्या दोन अनोळखी व्यक्तींनी ४६ वर्षीय महिलेच्या हातातील ८८ हजार रुपयांचा मोबाईल हिसकावून पलायन केले. याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मीनल खंदारे या कामोठे येथे राहतात. त्या कामोठे सेक्टर २० मधील मार्केटमध्ये गेल्या होत्या. खांदेश्वर रेल्वे स्टेशनकडे जाण्यासाठी त्या आणि त्यांची बहीण सेंट्रल बँकेसमोरील रस्ता ओलांडत असताना नंबर प्लेट नसलेल्या मोटरसायकलवरून दोघे आले आणि एकाने खंदारे यांच्या हातातील मोबाईल हिसकावला आणि ते खांदेश्वर रेल्वे स्टेशनच्या दिशेने पळून गेले.

### ब्लॅकमेल करणाऱ्यावर गुन्हा दाखल

**पनवेल :** महिलेचे आक्षेपार्ह फोटो गावात दाखवण्याची धमकी दिल्याप्रकरणी आरोपी उपेंद्र अद्यासिंग याच्याविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित महिला २६ वर्षाची असून उपेंद्र याने नकळत त्यांचे काही आक्षेपार्ह फोटो काढले होते. त्यानंतर २०१८ मध्ये त्याच्याविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली. त्यानंतर त्याच्यावर पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. मे २०२५ मध्ये या महिलेचे लग्न झाले. त्यानंतर उपेंद्रने महिलेच्या दिराच्या मोबाईलवर फोन करुन महिलेचे फोटो पाठवले आणि पीडित महिलेशी लग्न झाल्याचे खोटे सांगितले. तसेच २०१८ मध्ये नोंद केलेला गुन्हा मागे घेवून सात लाख रुपयांची मागणी केली.

### मोलकरणीने केले दागिने, पैसे लंपास

**पनवेल :** खारघरमध्ये प्राध्यापक महिलेकडे घरकाम करणाऱ्या महिलेने रोख रक्कम आणि सोन्याचे दागिन्यांची चोरी केली आहे. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात रिंकी कुमार या महिलेविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राध्यापक महिलेने तीन लाख ५६ हजार रुपये आणि दागिने ड्रॉवरमध्ये ठेवले होते. सामानाची आवराआवर करताना त्यांनी पैसे आणि दागिने सापडले नाहीत. म्हणून संशयावरून त्यांनी रिंकी कुमार आणि तिच्या पतीला फोन करून वस्तू परत करण्याबाबत सांगितले. त्यावर त्यांनी टाळाटाळ केली. त्यानंतर त्यांच्याविरोधात खारघर पोलिसांत तक्रार करण्यात आली.

# ‘लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा सामाजिक कार्याचा वारसा सर्वांनी पुढे चालवायला हवा’





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सामाजिक कार्याचा वारसा आपल्याल दिला असून तो सर्वांनी पुढे चालवला पाहिजे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल शहरामध्ये केदार भगत मित्र परिवाराकडून आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराच्या उद्घाटनावेळी केले.

दरम्यान, या शिबिराला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देऊन केदार भगत मित्र परिवाराच्या वतीने राबवण्यात आलेल्या या उपक्रमाचे कौतुक केले. दानशूर व्यक्तीमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त केदार भगत मित्र परिवाराकडून रक्तदान शिबिराचे आयोजन पनवेल शहरातील लोकनेते दि.बा.पाटील शाळेत रविवारी (दि.१) करण्यात आले होते.



या शिबिराचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्याहस्ते आणि भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. या रक्तदान शिबीराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून अनेकांनी रक्तदान केले. या शिबिरात दि न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनीचा एक लाखापर्यंतचा अपघाती विमा मोफत काढून देण्यात आला. दरम्यान, या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते रकदात्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमावेळी जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी नगरसेवक राजू सोनी, अजय बहिरा, केदार भगत, माजी नगरसेविका दर्शना भोईर, प्रिती जॉर्ज, सारिका भगत, सुरेखा मोहकर, व्यपारी आघाडीचे अध्यक्ष संजय जैन, शहर सरचिटणीस रूपेश नागवेकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. या वेळी केक कापून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

## रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये खेळाडूंचा गौरव



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवस वर्षानिमित्त रायगड जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन आणि योनेक्स सनराइज यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्हा बॅडमिंटन चॅम्पियनशिप आणि निवड चाचणी उलवे येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेला काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी रविवारी भेट दिली.

या वेळी त्यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आल असून पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या अनेक मान्यवरांनी पुष्पगुच्छ देऊन अभिष्टचिंतन केले. दरम्यान, महेंद्र घरत यांनी त्यांच्यावतीने रायगड बॅडमिंटन असोसिएशनच्या खेळाडूंना ५० हजार आणि सन्मानचिन्ह त्यांचा गौरव केला. या वेळी रक्षा कंदसामी, गाथा सुर्यवंशी, अनुष्का इप्टे, प्रकृती शर्मा आणि मयुरेश भुटकी यांना गौरवण्यात आले. या वेळी पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, रवींद्र भगत आणि खेळाडू उपस्थित होते.



**पनवेल :** भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत यांनी अशोक साळुंखे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त आदिवासीवाडीत रेनकोट वाटप करण्यात आले. या वेळी माजी नगरसेविका दर्शना भोईर, विनोद भगत आदी उपस्थित होते.**

## पनवेल तालुक्यातील १३ अनधिकृत शाळांना नोटीस

**पनवेल : वार्ताहर**

विनापरवानगी सुरू केलेल्या १३ शाळा बंद कराव्यात यासाठी पनवेल पंचायत समितीच्या शिक्षण विभागाने नोटिसा बजावल्या आहेत. पनवेल तालुक्यात १३ शाळा अनधिकृत असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर कारवाई आणि दंडाच्या नोटिसा पंचायत समितीने बजावल्या आहेत.

पनवेल तालुक्यात अनेक अनधिकृत शाळा कित्येक वर्षांपासून सुरू आहेत. दरवर्षी त्यांच्यावर नोटीस बजावण्याशिवाय कोणतीही कारवाई केली जात नाही. अशा अनधिकृत शाळांवर कायदेशीर कारवाईची प्रक्रिया करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करणे गरजेचे आहे, मात्र नोटीसा देऊन त्यांची सुटका केली जाते. तालुक्यातील न्यू इंग्लिश स्कुल (नेरे), किड्स गार्डन पब्लिक स्कूल (टेमघर), एस.जी.टी. इंटरनॅशनल (करंजाडे, आर १), साईगणेश एज्युकेशन सोसायटी नवजीवन इंटरनॅशनल स्कूल (खारपाडा), वेदिक ट्री इंटरनॅशनल स्कूल (करंजाडे सेक्टर ३), वेदगृह इंटरनॅशनल स्कूल (करंजाडे सेक्टर ४), दि बुद्धिष्ट इंटरनॅशनल स्कूल (ओवळे), सनराईस इंग्लिश स्कूल (वावंजे), दि बुद्धिष्ट इंटरनॅशनल स्कूल (आर १, करंजाडे), कै. मंजुळा त्रिंबक (साखरेशेठ) ठाकूर इंग्रजी माध्यम शाळा (पाले बुदुक कोळवाडी), ज्ञानाई माध्यमिक विद्यालय (धामणी-वाजे), न्यू इंग्लिश स्कूल (कोपरा), आशाप्रभा न्यू इंग्लिश स्कूल (विचुंबे) या शाळांना सरकारची मान्यता नाही. त्यामुळे या शाळा अनधिकृत असल्याचे पनवेल पंचायत समितीने जाहीर केले आहे.

शिक्षण विभागाने पाठवलेल्या नोटिसीमध्ये अनधिकृत शाळा बंद कराव्यात तसेच नवीन वर्षी या शाळा सुरू करू नयेत आणि विद्यार्थ्यांना बाजूच्या शाळेमध्ये समायोजित करावे तसेच शाळेला सूचना देऊन ही शाळा बंद न केल्यास शाळा व्यवस्थापनास एक लाखाचा दंड किंवा प्रत्येक दिवसाला १० हजार रुपये दंड ठोठावण्यात येणार असल्याचे नमूद केले आहे.

## पनवेल महापालिकेत लोकशाही दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सर्व सामान्य जनतेच्या तक्रारी व समस्या तत्परतेने सोडविण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयातील बैठक कक्षामध्ये २ जून रोजी आयुक्त मंगेश चितळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये ‘लोकशाही दिनाचे’ आयोजन करण्यात आले.



आजच्या बैठकित नागरी सेवा सुविधा, बांधकाम विभाग अशा विविध विभागाचे पाच अर्ज दाखल झाले होते. या वेळी नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविण्यात आल्या.

या कार्यक्रमास परिवहन विभाग व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त सर्वश्री, डॉ.वैभव विधाते, स्वरूप खारगे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, सहाय्यक आयुक्त सर्वश्री श्रीराम पवार, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख किर्ती महाजन, कार्यकारी अभियंता सुधीर सांळुखे, विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

नागरिकांच्या तक्रारी, अडचणी सोडविण्यासाठी प्रशासन आणि नागरिकांमध्ये संवादवाढीसाठी महापालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येत आहे. नागरिकांनी आपले वैयक्तिक अर्ज समन्वय अधिकाऱ्यांकडे पंधरा दिवस आधी द्यावेत. संबंधित नागरिकांनी लोकशाही दिनादिवशी उपस्थित रहावे.

## प्राचार्य गोवर्धन गोडगे यांना सेवानिरोप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजचे मुख्याध्यापक गोवर्धन चिंतामणी गोडगे यांना रयत शिक्षण संस्थेमधील प्रदीर्घ सेवेनंतर नियत वयोमानानुसार सेवापूर्ती निमित्त पुष्पगुच्छ देऊन व मिठाई भरवून विद्यालयाच्या वतीने अभिनंदन करून शुभेच्छा देण्यात आल्या.



या वेळी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे, उपशिक्षक विशांत ठाकूर, वरिष्ठ लेखनिक निलेश गोडे, ग्रंथपाल महेश म्हात्रे, लेखनिक चंद्रकांत मढवी व सेवक जनार्दन खैरे आदी उपस्थित होते.

## लोकनेते गोपीनाथ मुंडेंच्या पुण्यतिथीनिमित्त कळंबोलीमध्ये आज विविध कार्यक्रम

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**



लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्त मंगळवारी (दि.३) कळंबोलीमधील सेक्टर ४ येथे स्वामी समर्थ मंदिरामध्ये १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत रक्तदान शिबिर त्यानंतर हभप आदिनाथ महाराज लाड आळंदी देवाची यांचे हरिकीर्तन होईल व त्यानंतर नऊ ते दहा महाप्रसाद होईल.

या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन जय भगवान युवा प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात येत आहे. कार्यक्रमास लोकनेते रामशेठ ठाकूर आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, प्रदेश कार्यकारिणी सदस्य बाळासाहेब पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे सर्व नगरसेवक नगरसेविका तसेच कळंबोलीतील सर्व समाजसेवक उपस्थित राहणार आहेत. रक्तदान करून समाजकार्यात आपला हातभार लावावा, असे आवाहन भाजप नेते बबन बारगजे यांनी केले आहे.

## भारतीय जनता युवा मोर्चातर्फे पनवेलमध्ये रक्तदान उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर २ जून रोजी ७५ व्या वर्षात पदार्पण करणार आहेत. त्या अनुषंगाने अमृत महोत्सव वर्षनिमित्त विविध कार्यक्रमे आयोजित करण्यात येणार असून त्यातील एक भाग म्हणून भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने रायगड जिल्ह्यातील रक्ततुटवडा भरून काढण्यासाठी रविवारी (दि.१) एक विशेष रक्तदान उपक्रम सुरू केला आहे.



या उपक्रमांतर्गत दर महिन्याच्या पहिल्या रविवारी एक भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात येणार आहे. हा उपक्रम संपूर्ण वर्षभर राबविण्यात येणार असून, विशेषतः थॅलेसिमिया ग्रस्त रुग्णांसाठी आणि इतर गरजू रुग्णांसाठी या रक्तदान उपक्रमाचे मोठे योगदान ठरणार आहे. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन भाजपचे नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे यांच्या हस्ते झाले. दरम्यान, या शिबिराला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन उपक्रमाचे कौतुक लेले. या भव्य रक्तदान शिबिर हा कार्यक्रम केवळ सामाजिक भानातून नव्हे तर एक प्रकारचा मानवतेचा महोत्सव म्हणून साजरा होत आहे.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी समाजसेवा, आरोग्य व जनकल्याणाचे कार्य आपल्या राजकीय जीवनात सातत्याने केले आहे आणि त्याच परंपरेतून हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आणि रक्तदानासाठी विशेष मेहनत घेतली जाणार आहे. त्या अनुषंगाने रविवारी नवीन पनवेल येथील सीकेटी विद्यालयात सकाळी ८ वाजता प्रारंभ झाला. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, सरचटणीस नितीन पाटील, प्रकाश बिनेदार, माजी नगरसेवक अनिल भगत, संतोष शेट्टी, मनोज भुजबळ, गणेश कडू, अजय बहिरा, गणेश पाटील, तेजस कडपिले, माजी नगरसेविका वृषाली वाघमारे, नेरे मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, पनवेल शहर मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, अमरीश मोकल, जितेंद्र वाघमारे, यतीन पाटील, शहर सरचिटणीस रुपेश नागवेकर, शिवाजी भगत, अजय कांडपिले, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, अभिषेक भोपी, खारघर शहर युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील, श्रवण घोसाळकर, गौरव कांडपिले, शिवानी घरत, शुभम कांबळे, वरुण डांगर, ऋषी साबळे, नितेश घुगे, गणेश सरवणकर,विजय म्हात्रे, मयुर कदम, अक्षय सिंह, यमुना प्रकाशन यांच्यासह पदाधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान, या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार यांना वाढदिवसानिमित्त उपस्थित मान्यवरांनी पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या.



## संपादकीय

# अपप्रचार अयोग्य

'ऑपरेशन सिंदूर'ने आपले लक्ष्य गाठले हे निर्विवाद सत्य आहे. मोहीमेतील तपशील योग्य वेळी जाहीर केले जातील. कुठल्याच लष्करी मोहिमेतील तपशील मोहिमेदरम्यान वा लगेच जाहीर केले जात नाहीत. त्यासाठी सुयोग्य वेळेपर्यंत थांबावे लागते. तोवर राजकीय हेतूने प्रेरित होऊन चुकीचा प्रचार करून आपल्या लष्करावरील ताण वाढवणे कदापिही योग्य ठरत नाही.

**जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याचा बदला घेतलाच पाहिजे अशी तीव्र भावना त्या दुर्दैवी घटनेनंतर देशवासियांच्या मनात होती. कारण या हल्ल्यात २५ निष्पाप भारतीय पर्यटकांचा बळी गेला होता. या हल्ल्यास जबाबदार असणाऱ्यांना व त्यांच्या पाठिराख्यांना कल्पनेपलीकडची शिक्षा देऊ असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले होते. पाकिस्तानविरोधात भारत सरकारने अनेक कठोर पावले उचलली व सरतेशेवटी देशातील नागरिकांच्या भावनेचा आदर राखत भारतीय सैन्यदलांनी अतिशय जबाबदारीने 'ऑपरेशन सिंदूर' पार पाडले. अवघा देश हे जाणतो. या ऑपरेशनच्या काळात भारताची विमाने पाडल्याचा दावा पाकिस्तानकडून करण्यात आला होता. त्यासंदर्भात संरक्षण दलप्रमुख (सीडीएस) जनरल अनिल चौहान यांनी शनिवारी सिंगापूर येथे एका मुलाखती दरम्यान केलेल्या विधानावरून विरोधकांनी आता राजकारण सुरू केले आहे. पाकिस्तानसोबतच्या संघर्षाच्या पहिल्या दिवशी नुकसान झाल्यानंतर भारताने आपली रणनीती बदलली आणि त्यानंतरच्या काळात मात्र भारताने निर्णायक आघाडी मिळवली व नंतरच दोन्ही देशांकडून शस्त्रविराम जाहीर करण्यात आला असे चौहान यांनी एका विदेशी प्रसारमाध्यमाला दिलेल्या मुलाखतीत शनिवारी सांगितले. सिंगापूर येथील शांग्री-ला संवाद सुरक्षा परिषदेदरम्यान त्यांनी ही मुलाखत दिली. जनरल चौहान यांच्या या विधानाचा राजकीय हेतूंनी वापर करण्याचा प्रयत्न विरोधकांकडून सुरू झाला आहे. वास्तविक, सुरूवातीला काही नुकसान झाल्यानंतर आम्ही नव्या रणनीतीने चोख उत्तर दिले असे चौहान यांनी म्हटलेले असताना तेवढ्यावरून किती भारतीय लढाऊ विमाने पाकिस्तानने पाडली त्याचे आकडे सरकारने का जाहीर केले नाहीत म्हणत काँग्रेसने ओरड सुरू केली. वास्तविक चौहान यांनी देखील मुलाखतीत याबद्दलचा तपशील देण्यास नकारच दिला आहे. या तपशीलांपेक्षा, नुकसान का झाले आणि आपण त्यानंतर काय करणार हे अधिक महत्वाचे होते. त्यामुळे आम्ही रणनीतीमध्ये सुधारणा केली आणि नंतर मोठ्या संख्येने पाकिस्तानच्या आतमध्ये असलेल्या हवाई तळांना लक्ष्य करण्यासाठी परत गेलो. त्यांच्या सर्व हवाई सुरक्षा यंत्रणा भेदल्या. अचूक हल्ले केले असे चौहान यांनी सांगितले. १० तारखेला भारतीय हवाई दलाने सर्व प्रकारच्या विमानांची सर्व प्रकारच्या शस्त्रांसह उड्डाणे केली, असेही चौहान यांनी सांगितले. यापूर्वी डायरेक्टर जनरल ऑफ एअर ऑपरेशन एअर मार्शल ए. के. भारती यांनीही नुकसान हा युद्धाचा एक भाग आहे असे म्हटले होते. भारताने पाकिस्तानची काही विमाने पाडल्याचेही त्यांनी म्हटले होते. या दोन्ही लष्करी अधिकाऱ्यांचे विश्लेषण एका प्रगल्भ दृष्टिकोनातून समजून घेण्याची गरज आहे. दुर्दैवाने विरोधकांकडून तशी अपेक्षा करता येणार नाही. सैन्याचा १५ टक्के वेळ खोट्या बातम्यांना प्रत्युत्तर देण्यातच गेला असेही चौहान यांनी म्हटले आहे. युद्धाच्या काळात शत्रूकडून अनेक गोष्टी पसरवल्या जातात. अपप्रचारही रणनीतीचाच भाग असतो. भारताची सहा विमाने पाडली हा पाकिस्तानचा दावा पूर्णपणे चुकीचा असल्याचेही चौहान यांनी स्पष्टपणे सांगितले आहे हेही लक्षात घेतले पाहिजे.**

# तंबाखूचे विष जाणतो, पण गांभीर्य समजत नाही!

तंबाखू हे सहज उपलब्ध होणारे विष आहे, जे हळूहळू शरीराला पोकळ करते आणि प्राणघातक आजारांनी ग्रस्त करून वेदनादायक अकाली मारते. समाज, देश उच्चशिक्षित आणि आधुनिक झाला आहे, पण लोकांचे छंदही वाढत आहेत, तंबाखूचे नवीन फ्लेवर बाजारात उपलब्ध होत आहेत. लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत, सर्वजण मोठ्या प्रमाणात तंबाखूचे सेवन करतात. सामान्यतः वापरल्या जाणाऱ्या तंबाखू उत्पादनांमध्ये बिडी, सिगारेट आणि हुक्का यांचा समावेश होतो. भारतात सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या धूरविरहित तंबाखू उत्पादनांमध्ये तंबाखू तसेच खैनी, गुटखा आणि सुपारी यांचा समावेश आहे. दररोज, तंबाखू आणि निकोटीन उद्योग नवीन पिढ्यांना आकर्षित करण्यासाठी आणि विद्यमान वापरकर्त्यांना टिकवून ठेवण्यासाठी अत्याधुनिक उत्पादने आणि फसव्या रणनीती वापरतात.



तंबाखूच्या विषारीपणाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी दरवर्षी ३१ मे रोजी जागतिक तंबाखू विरोधी दिन साजरा केला जातो. या वर्षी २०२५ची थीम होती. अपील उलगडणे : तंबाखू आणि निकोटीन उत्पादनांवरील उद्योग धोरणे उघड करणे. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, जगभरात १३-१५ वर्षे वयोगटातील ३७ दशलक्ष मुले तंबाखूचे सेवन करतात असा अंदाज आहे. अनेक देशांमध्ये, प्रौढांपेक्षा तरुणांमध्ये ई-सिगारेटचा वापर जास्त आहे. ई-सिगारेट, निकोटीन पाउच आणि गरम केलेल्या तंबाखू उत्पादनांचा प्रचार करणारे मार्केटिंग साहित्य सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर ३.४ अब्ज पेक्षा जास्त वेळा पाहिले गेले आहे. अनेक निकोटीन आणि तंबाखू उत्पादनांमध्ये फ्लेवर्स आढळतात, ज्यामध्ये अंदाजे १६,००० प्रकारचे फ्लेवर्स असतात आणि लोक निकोटीन आणि तंबाखू उत्पादने वापरण्यास सुरुवात करण्याचे मुख्य कारण म्हणून फ्लेवर्सचा उल्लेख करतात. यूएस नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनच्या एका अहवालात असे आढळून आले आहे की भारतातील ८३ ऑनलाइन स्टोअर्स बेकायदेशीरपणे ई-सिगारेट विकत आहेत, यापैकी ६१.४ टक्के गुगल सर्च इंजिनच्या शोधद्वारे घेण्यात आले, त्यानंतर सोशल मीडियाचा क्रमांक लागतो. २०१९ मध्ये बंदी लागू झाल्यानंतर जवळजवळ अर्धे भारतीय ऑनलाइन स्टोअर्स दिसू लागले हे लक्षात घेण्यासारखे आहे.

अमेरिकन लंग असोसिएशनच्या मते, अमेरिकेत दरवर्षी ४,९०,००० हून अधिक लोक तंबाखूच्या सेवनामुळे आणि दुसऱ्या द्वारे केलेल्या धूम्रपानाच्या धुराच्या संपर्कामुळे मृत्युमुखी पडतात. सिगारेटच्या धुरात ७,००० हून अधिक रसायने असतात, त्यापैकी किमान ६९ रसायने कर्करोगास कारणीभूत ठरतात असे ज्ञात आहे. फुफ्फुसांच्या कर्करोगामुळे होणाऱ्या सुमारे ९० टक्के मृत्यू आणि क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीजमुळे होणाऱ्या सुमारे ८० टक्के मृत्यूंसाठी धूम्रपान थेट जबाबदार आहे. सध्याच्या धूम्रपान करणाऱ्यांमध्ये, धूम्रपानाशी संबंधित ७३ टक्के आजार हे फुफ्फुसांचे जुनाट आजार आहेत. धूम्रपान शरीराच्या जवळजवळ प्रत्येक अवयवाचे नुकसान करते, ते कोरोनरी हृदयरोग, स्ट्रोक आणि इतर अनेक कर्करोग आणि आजारांचे कारण देखील आहे.

तंबाखू ॲटलासनुसार, भारतात धूम्रपानाचा आर्थिक खर्च १,९७१,१४५,०५२,४८० आहे, ज्यामध्ये आरोग्य सेवेशी संबंधित प्रत्यक्ष खर्च तसेच आजारपणामुळे आणि अकाली मृत्यूमुळे उत्पादकता कमी होण्याशी संबंधित अप्रत्यक्ष खर्च समाविष्ट आहेत. भारतात प्रौढ धूम्रपान करणाऱ्यांची संख्या ७,३९,२६,२४१ आहे. भारतात ८.९ टक्के मृत्यू हे तंबाखूच्या सेवनामुळे होतात. २०२३ मध्ये भारतात १०७,९१५,९००,००० सिगारेटचे उत्पादन झाल्याचा अंदाज आहे. २०२२ मध्ये, जगातील सहा सर्वात मोठ्या तंबाखू कंपन्यांचे एकत्रित उत्पन्न ३६२ अब्ज अमेरिकन डॉलर्स होते. २०२२ मध्ये, भारताने ४२५,२९६ हेक्टर शेत जमिनीवर ७७२,१५२ टन तंबाखूचे उत्पादन केले जे पौष्टिक धान्य पिकवण्यासाठी वापरले जाऊ शकले असते.

जागतिक आरोग्य संघटनेच्या प्रमुख तथ्यांनुसार, तंबाखूचे सेवन करणाऱ्यांपैकी अर्ध्याहून अधिक लोकांचा मृत्यू होतो. तंबाखूमुळे दरवर्षी ८० लाखांहून अधिक लोकांचा मृत्यू होतो, ज्यामध्ये अंदाजे १३ लाख धूम्रपान न करणारे पण इतर लोकांद्वारे केल्या गेलेल्या धूम्रपानाच्या धुराच्या संपर्कात येऊन जीव गमावतात. जगातील १.३ अब्ज तंबाखू सेवन करणाऱ्यांपैकी सुमारे ८० टक्के लोक कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये राहतात. २०२० मध्ये, जगातील २२.३ टक्के लोकसंख्येने तंबाखूचे सेवन केले. तंबाखू उत्पादनांच्या बेकायदेशीर व्यापारामुळे जगभरात गंभीर आरोग्य, आर्थिक आणि सुरक्षा समस्या निर्माण होतात. असा अंदाज आहे की जगभरात वापरल्या जाणाऱ्या प्रत्येक १० सिगारेट आणि तंबाखू उत्पादनांपैकी १ बेकायदेशीर आहे. डब्ल्यूएचओ च्या मते, भारतात दररोज सुमारे ३६०० लोक तंबाखूच्या सेवनामुळे मृत्युमुखी पडतात. ऑस्ट्रेलियन सरकारच्या आरोग्य आणि वृद्धांची काळजी विभागाच्या मते, धूम्रपानामुळे सरासरी १० वर्षांनी आयुर्मान कमी होऊ शकते.

भारत सरकारच्या वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या तंबाखू मंडळ (एक स्वायत्त संस्था) च्या अधिकृत वेबसाइटवरून मिळालेल्या माहितीनुसार, तंबाखू हे भारतातील एक महत्त्वाचे व्यावसायिक पीक आहे, हे २०२३-२४ मध्ये ४५.७ दशलक्ष लोकांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे रोजगार देते आणि राष्ट्रीय तिजोरीत १२,००५.८९ कोटी रुपयांचे परकीय चलन देते. तंबाखू उत्पादनात भारत जगात आघाडीवर आहे. २०२२ दरम्यान, भारत जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा उत्पादक (एफएओ राज्य डेटा, २०२२), दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा निर्यातदार (प्रमाणानुसार) आणि पाचव्या क्रमांकाचा कच्च्या तंबाखूचा निर्यातदार (मूल्यानुसार) आहे. भारतात फ्लू-क्युअर केलेल्या व्हर्जिनिया तंबाखूच्या विविध शैलींचे उत्पादन केले जाते, जे त्यांच्या भौतिक आणि रासायनिक वैशिष्ट्यांमध्ये भिन्न असतात. या तंबाखू मंडळाची मुख्य उद्दिष्टे आहेत:- उत्पादनाचे नियमन करणे, परदेशात विपणनाला प्रोत्साहन देणे आणि मागणी आणि पुरवठ्यातील असंतुलनाच्या वारंवार घडणाऱ्या घटनांवर नियंत्रण ठेवणे ज्यामुळे बाजारपेठेत समस्या निर्माण होतात. तंबाखू उद्योगाला चालना देण्यासाठी वैज्ञानिक, तांत्रिक आणि आर्थिक संशोधनाचे प्रायोजकत्व, मदत, समन्वय किंवा प्रोत्साहन देणे.

भारत सरकारने ११व्यापंचवार्षिक योजनेदरम्यान २००७-०८ मध्ये राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम म्हणजेच एनटीसीपी सुरू केला.तंबाखू सेवनाच्या हानिकारक परिणामांबद्दलजागरूकता निर्माण करणे, तंबाखू उत्पादाचे उत्पादन आणि पुरवठा कमी करणे,सिगारेटआणि इतर तंबाखू उत्पादने कायदा,२००३अंतर्गततरतुदींची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे.

लोकांना तंबाखू सेवन सोडण्यास मदत करणे आणि तंबाखू नियंत्रणावरील जागतिक आरोग्य संगठनाच्या फ्रेमवर्क कन्व्हेन्शनद्वारे समर्थित तंबाखू प्रतिबंध आणि नियंत्रणासाठी धोरणांची अंमलबजावणी सुलभ करणे. एनटीसीपीची अंमलबजावणी तीन-स्तरीय रचनेद्वारे केली जाते: केंद्रीय पातळी, राज्य पातळी आणि जिल्हा पातळी. जिल्हा पातळीवर तंबाखू सेवन बंद करण्याची सेवा स्थापन करण्याची तरतूद देखील आहे. सध्या हा कार्यक्रम देशभरातील ६०० हून अधिक जिल्ह्यांसह सर्व ३६ राज्ये ,केंद्रशासित प्रदेशांमध्ये राबविला जात आहे. राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत कल्पना केलेल्या विविध उपक्रमांचे एकूण धोरण तयार करणे, नियोजन करणे, अंमलबजावणी करणे, देखरेख करणे आणि मूल्यांकन करणे यासाठी ते जबाबदार आहे. भारत सरकारने तंबाखू सोडण्यासाठी राष्ट्रीय क्विटलाइनची स्थापना केली आहे, सेवांसाठी टोल फ्री क्रमांक १८०० ११२ ३५६ वर कॉल करा धुराचा प्रत्येक फुगवटा जीवनातील मौल्यवान क्षणांना झपाट्याने कमी करतो. तंबाखू हे विष आहे, ते ताबडतोब सोडा, आनंदी आणि निरोगी जीवनाशी नाते जोडा.

**-डॉ. प्रीतम भी. गेडाम**



## बदलते तंत्रज्ञान

# हॉटेलच्या रूममधील हिडन कॅमेरा असा शोधा

हॉटेलमध्ये चेक इन केल्यानंतर, जेव्हा तुम्ही तुमच्या खोलीत जाल तेव्हा सीलिंग फॅनमधून लाल दिवा चमकत आहे का ते तपासा. यासाठी तुम्ही टॉर्च किंवा फ्लॅशलाईटचा वापर करू शकता.विचित्र वस्तूंकडे दुर्लक्ष करू नका



तुम्ही खोलीत जाल तेव्हा अशी जागा शोधा जिथून बहुतेक खोली दिसू शकेल. अशा ठिकाणी कॅमेरा लपवला जाऊ शकतो. यामध्ये विषमपणे, विचित्रपणे लावलेले आरसे किंवा इतर सजावटीच्या वस्तू असतात. एखादी वस्तू खोलीत असण्याची काहीच गरज नाही, किंवा योग्य जागी नाहीये, असं तुम्हाला वाटलं तर ती लगेच चेक करा. अगदी अनावश्यक वाटणारी अतिरिक्त वायर देखील छुप्या कॅमेऱ्याला जोडलेली असू शकते.विद्युत उपकरणांमध्येही लपवू शकतात कॅमेरा लपविलेल्या उपकरणांना ऑपरेट करण्यासाठी वीज लागते. त्यामुळे, खोलीत विजेच्या अतिरिक्त तारा आहेत की नाही किंवा लुकलुकणारे दिवे आहेत का ते नीट तपासा.

छुपे कॅमेरे हे म्युझिक सिस्टीम किंवा अगदी टीव्हीच्या स्पीकर आणि स्पीकर मेशमध्ये सहजपणे ठेवलेले असतात. हे टॉर्चच्या प्रकाशाने शोधले जाऊ शकतात. कॅमेरा लपलेला आहे हे तुम्हाला नीट कळू शकले नाही, तर तुम्ही तो रुमाल, टॉवेल किंवा टिश्यू पेपरने झाकून ठेवू शकता.हुक किंवा टॉवेल होल्डरकडे लक्ष द्या  खोलीतच नाही तर बाथरूममध्येही कॅमेरा लपवलेला असू शकतो. म्हणूनच, बाथरूम वापरण्यापूर्वी हुक, टॉवेल होल्डर किंवा हेअर ड्रायर होल्डर नीट तपासा.

फायर अलार्म किंवा स्मोक डिटेक्टर्ससामान्यतः लोक या गोष्टींकडे दुर्लक्ष करतात, परंतु तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की या उपकरणांमध्येही कॅमेरा लपवला जाऊ शकतो. .डोअर नॉब, हँडल्सखोलीमध्ये अशी काही ठिकाणे आहेत जिथे कॅमेरे लपवले जाऊ शकतात आणि अनेकदा या जागा कोणाच्याही लक्षात येत नाहीत. म्हणून, दरवाजाचे नॉब, हँडल आणि दरवाजे देखील नीट तपासा.लाईट बंद करून लेन्स तपासाजर तुम्हाला कॅमेऱ्याचा लुकलुकणारा लाल दिवा दिसत नसेल तर एक सोपा उपाय आहे. खोलीतील सर्व दिवे बंद करा. लेन्सचा रिफ्लेक्टिव पृष्ठभाग अंधारात दिसू शकतो. सर्व दिवे बंद करा आणि लुकलुकणारे किंवा रिफ्लेक्टिव दिवे पहा.

तुमच्या बोटाचे नख आरशावर ठेवा, त्याचे प्रतिबिंब आरशात दिसतं का ते पहा. ते प्रतिबिंब व तुमचे बोट यांच्यामध्ये अंतर नसेल तर आरशच्या उलट्या बाजूला कॅमेरा लावलेला असू शकतो.

# बॉलीवूडचे शोमॅन राज कपूर

दोन दशकांत समाज आणि सिनेमात वेगाने परिवर्तन झाले आहे. तंत्रज्ञानामुळे अनेक बदल झाले आहेत. भारतीय चित्रपटसृष्टीला १०० वर्षे पूर्ण झाल्याच्या महोत्सवावेळी आज राज कपूर जिवंत असते तर रस्त्यावर नाचले-गायले असते, कारण चित्रपटच त्यांचे पहिले प्रेम आणि विचाराचे केंद्र होते. व्ही शांताराम, गुरुदत्त आणि सत्यजित रे अशा चित्रपट निमार्त्यांकडे चित्रपटाशिवाय दुसरी योग्यता होती.



## निमित्त

सत्यजित रे एका आंतरराष्ट्रीय कंपनीत पुस्तकांच्या कव्हर आणि आतील पानावर रेखाचित्र बनवण्यात निपुण होते. गुरुदत्त यांनी पं. उदयशंकर यांच्या शाळेत शास्त्रीय नृत्य शिकले होते. फक्त राज कपूर हेच सिनेमा व्यतिरिक्त काहीच करू शकत नव्हते. ते दहावी नापास होते. ते फक्त सर्कसमध्ये 'जोकर'चे काम करू शकले असते किंवा आवारा भटकले असते. त्यांचा जन्मच चित्रपट कलेत व्यक्त होण्यासाठी झाला होता.

राज कपूर यांचा जन्म १४ डिसेंबर १९२४ रोजी पेशावर येथे झाला राज कपूर यांनी आठ वर्षांचे असताना चित्रपटाच्या जाहिराती आणि चित्र चिटकवून एक स्क्रॅप बूक तयार केले होते. ते आजही कृष्णा राजकपूर यांनी जपून ठेवले आहे. तारुण्यात त्यांना एका किशोरवयीन मुलीशी प्रेम झाले होते, दोघांच्या कुटुंबाचा परिचय होता. त्यामुळे लग्न शक्य होते. मुलीच्या वडिलाने राज कपूर यांना एकुलत्या एका मुलीशी लग्नानंतर घरजावई करून त्यांची शेकडो एकर जमीन आणि व्यवसाय सांभाळण्याचे सांगितले. राज कपूर यांचे मुलीवर मनापासून प्रेम करत होते; पण चित्रपट निर्माता होण्याचे स्वप्न बाळगल्यामुळे त्यांना घरजावई होणे मंजूर नव्हते. त्यामुळे त्यांचे हे लग्न होऊ शकले नाही. परतताना राजकपूर यांना मुलीची भेट घेतली त्या वेळी ती मुलगी अंगठा दाखवत त्यांना, म्हणाली, 'फिर ना आना इन गलियों चौबारों में' या घटनेच्या अनेक दशकानंतर 'प्रेम रोग'मध्ये सावकाराची लाडकी मुलगी, अंगठा दाखवत 'ये गलियां ये चौबारा, यहां आना ना दोबारा; की तेरा यहां कोई नहीं'. हे गीत म्हणते. या गाण्यात लावण्यात आलेला सेटदेखील त्या सावकाराच्या हवेलीसारखाच होता.

सिनेमामय राज कपूर यांनी आपल्या आयुष्याच्या घटनेवरच अनेक पटकथा लिहिल्या आणि चित्रपटासारखे 'लार्जर दॅन लाइफ' आयुष्यदेखील जगले. ते प्रत्येक वेळेस फक्त दृश्य किंवा कॅमेऱ्याचा विचार करत होते. त्यांचे आयुष्य संपादित नसलेल्या रीलप्रमाणे आहे, वडील पृथ्वीराज कपूर यांच्या नाटकातून राज कपूर थोड्याच भूमिकेतून खूप काही शिकले.

२ जून १९८८ मध्ये नवी दिल्लीत त्यांचे निधन झाल.  रितू नंदा यांच्या पुस्तकात राज कपूर यांच्या शेवटच्या दिवसांमधील कथन आहे' मला ज्या ध्येयापर्यंत पोहोचयचे होते, मी तिथपर्यंत पोहोचलो नाही, याचे मला दु:ख आहे. मी देवाला प्रार्थना करतो की, ज्या वेळी मी काम सुरू केले आहे, त्यावेळी मला नेऊ नकोस. देवाने दिलेल्या देणगीनुसार नियती आपल्याला यशोशिखर गाठण्याचे शिकवते; पण त्या वेळी कळते की शिकण्यात खूप वेळ गेला आणि आता जाण्याची वेळ झाली' कितीतरी पटकथा ते आपल्यासोबत घेऊन गेले असतील.

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# अक्रोड खाल्ल्याने प्रत्येक अवयवाला होतो फायदा

दररोज सकाळी अक्रोड खाल्ल्याने शरीरातील प्रत्येक अवयवाला त्याचा फायदा होतो. डॉ. जी. सुषमा यांच्या मते, अक्रोड हे ओमेगा-३ फॅटी ॲसिड्स, अँटिऑक्सिडंट्स, जीवनसत्त्वे आणि खनिजांनी समृद्ध असलेले पौष्टिक अन्न आहे. त्याचे नियमित सेवन केल्याने विविध आरोग्य फायदे मिळू शकतात.



हृदयाचे आरोग्य : अक्रोड त्याच्या ओमेगा-३ फॅटी ॲसिडच्या प्रमाणामुळे, कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करण्यास, जळजळ कमी करण्यास आणि एकूणच हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी आरोग्यास मदत करू शकते.

मेंदूचे आरोग्य : अक्रोडमध्ये ओमेगा-३ फॅटी ॲसिड असतात, जे संज्ञानात्मक कार्याशी संबंधित असतात आणि काही अभ्यासांवरून असे दिसून आले आहे की, याचे नियमित सेवन केल्याने मेंदूच्या आरोग्यावर सकारात्मक परिणाम होऊ शकतो.

अँटिऑक्सिडंट सपोर्ट : अक्रोडमध्ये पॉलिफेनॉलसारखे अँटिऑक्सिडंट असतात, जे मुक्त रॅडिकल्समुळे होणाऱ्या नुकसानापासून पेशींचे संरक्षण करण्यास मदत करू शकतात.

निरोगी चरबी, अँटिऑक्सिडंट्स आणि आवश्यक पोषक तत्वांनी समृद्ध असलेल्या अक्रोडाचे अनेक आरोग्य फायदे आहेत. तथापि उष्ण, दमट उन्हाळ्यात ते लवकर खराब होऊ शकतात.

फ्रीजमध्ये ठेवा : अक्रोड फ्रीजरमध्ये हवाबंद डब्यात साठवा. फ्रीजमध्ये ठेवलेले अक्रोड सहा महिन्यांपर्यंत पौष्टिक मूल्य टिकवून ठेवतात.

हवाबंद कंटेनर वापरा : अक्रोड टिकवण्यासाठी, ओलावा आणि हवेचा संपर्क मर्यादित असावा. काचेच्या भांड्यात किंवा व्हॅक्यूम-सील केलेल्या पिशव्या फायदेशीर ठरतील.

पेंट्रीमध्ये साठवणे टाळा : उष्णता आणि आर्द्रतेमुळे अक्रोड लवकर खराब होतात. जर पेंट्रीमध्ये साठवणूक करणे आवश्यक असेल तर ते थंड ठिकाणी साठवून काही आठवड्यांत सेवन करावे.

अक्रोड आरोग्यासाठी फायदेशीर असले तरी त्यात कॅलरीज जास्त असतात आणि जर आहारात त्यांचा समावेश केला नाही तर जास्त प्रमाणात सेवन केल्याने वजन वाढू शकते, म्हणून कॅलरीजची आवश्यकता ओलांडू नये सुषमा म्हणाल्या. अक्रोडाची ॲलर्जी असलेल्या लोकांना ती टाळण्यासाठी अक्रोड आणि इतर ट्री नट्स टाळण्याचा इशारा त्यांनी दिला.

# भरतशेठ यांना मंत्री करून शिंदेंनी न्याय केला -मंत्री योगेश कदम

**महाड : प्रतिनिधी**

ना. भरत गोगावले यांच्या कार्यकर्तृत्वाची दखल घेत त्यांना मंत्री करून एकनाथ शिंदे यांनी खरा न्याय केला, असे प्रतिपादन मंत्री योगेश कदम यांनी गोगावले यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सभेदरम्यान केले. या वेळी रायगडमध्ये भाजप भरतशेठ आणि शिवसेनेसोबत राहणार, असा विश्वास आमदार प्रवीण दरेकर यांनी व्यक्त केला

या सभेत बोलताना ना योगेश कदम यांनी भरतशेठ यांना मंत्रिपद देऊन महाडला न्याय देण्याचे काम केले असे मत व्यक्त केले.



आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाबरोबर युती होईल, अशी भूमिका अलिबागचे आमदार महेंद्र दळवी यांनी याप्रसंगी मांडली.

अंगावर आले तर शिंगावर घेण्याची या रायगड व महाडच्या भूमीची शिकवण असल्याचे उद्गार भारतीय जनता पक्षाचे विधान परिषद सदस्य प्रवीण दरेकर यांनी व्यक्त केले.

मंत्री गोगावले यांनी जनतेचे आभार व्यक्त करत आपण गोरगरीबांचे शेठ असल्याचे सांगत लोकांसाठी माझ्या मनाचे आणि घराचे दरवाजे सदैव खुले असल्याचे म्हणाले. नियत आणि नीतिमत्तेने चालणारे काम करणारा म्हणून आपली ओळख असून आम्हाला कोणी देऊ नये असा सक्त इशारा विरोधकांना देतानाच चांगले काम करताना कोणी आडवे आल्यास शिवसैनिकांनी त्यांना आडवे घाला असा आदेश त्यांनी चांदे क्रीडांगणावर हजारोंच्या साक्षीने ऋणनिर्देश सोहळयासाठी आलेल्या जनतेसमोर दिला.

सलग चार वेळा निवडून येताना आपल्यामध्ये आपण लवचिकपणा कायम ठेवला जर चुकलो तर चार पावले मागे येण्याची मानसिकता आपली असून चुकीचे काही करणाऱ्यांना वीरेश्वर प्रशिक्षित दिल्याशिवाय राहणार नाही असे सांगितले आगामी निवडणुकीत युतीच्या सर्वांनी विजयासाठी सिद्ध व्हावे असे आवाहन करतानाच चांगले काम करताना कोणी आडवे आल्यास समोरच्याला आडवे करा असे स्पष्ट आदेश शिवसैनिकांना दिले.

या ऋणनिर्देश सोहळ्याला संपूर्ण विधानसभा मतदारसंघातून सुमारे दहा हजाराच्या वर नागरिक बंधू-भगिनी शिवसैनिक महिला आघाडी उपस्थित होत्या या कार्यक्रमांमध्ये सर्वांच्या साक्षीने मंत्री भरत गोगावले यांच्या वाढदिवसाचा केक कापण्यात आला.

# 'शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी सूक्ष्म नियोजन करावे'

**रायगड : रामप्रहर वृत्त**

शिवराज्याभिषेक सोहळा कार्यक्रमाचे दुर्गराज रायगड येथे तारखेनुसार ६ जून व तिथीनुसार ९ जून रोजी आयोजन करण्यात येणार आहे. यावर्षी शिवराज्याभिषेक सोहळा साडेतीनशे वर्ष पूर्ण झाल्याने येथील कार्यक्रमाला शिवप्रेमी नागरिकांची लाखोच्या संख्येने उपस्थिती होणार असल्याने या कार्यक्रमांची पूर्वतयारी करताना संबंधित विभागांनी सूक्ष्म नियोजन करावे असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ.विजय सुर्यवंशी यांनी दिले.



रायगड किल्ला येथे शिवराज्याभिषेक सोहळा २०२५ च्या अनुषंगाने नियोजन बैठक संपन्न झाली. त्या वेळी विभागीय आयुक्त सुर्यवंशी बोलत होते. या बैठकीस जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल, अपर जिल्हाधिकारी सुनिल थोरवे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) रविंद्र शेळके, यासह विविध शासकीय विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त सुर्यवंशी म्हणाले शिवराज्याभिषेक सोहळयासाठी राज्यातील विविध जिल्ह्यातून मोठ्या संख्येने शिवप्रेमी नागरिक रायगड येथे येत असतात या वर्षी होणाऱ्या सोहळा कार्यक्रमांसाठी आयोजकांकडून तयारी केली जात आहे. मागील वर्षी सुरक्षा व पायाभूत सुविधांवर मोठा ताण निर्माण झाला होता हा अनुभव लक्षात घेऊन यावर्षी कोणतीही समस्या उद्भवू नये या दृष्टीने आवश्यक त्या सुविधा निर्माण करण्यासाठी पूर्वतयारी केली जावी. येणाऱ्या नागरिकांच्या वाहनांचे पार्किंग,पिण्याचे पाणी, आरोग्य, स्वच्छता तसेच या कालावधीत आवश्यक असणाऱ्या विविध सुविधा उपलब्ध व्हाव्या यासाठी सूक्ष्म नियोजन करून कार्यवाही करावी असे विभागीय आयुक्त डॉ.विजय सुर्यवंशी यांनी सुचित केले. तसेच महाड व माणगाव मार्गे येणाऱ्या खाजगी वाहनांच्या वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी रस्त्यांची कामे, पार्किंगच्या जागा व तेथून गडाकडे जाणाऱ्या मार्गाची व्यवस्था संबंधित विभागांनी पूर्ण करावे तसेच आवश्यक ते माहिती देणारे फलक लावले जावेत असे सांगितले. मागील वर्षी झालेला सोहळ्याबाबत केलेली कार्यवाही व यंदाच्या पूर्वतयारी बाबत विविध प्रमुख अधिकाऱ्यांनी माहिती सादर केली.

# माथेरानमध्ये विकेंड हाऊसफुल्ल! वाहतूक कोंडीमुळे पर्यटकांचे हाल

**माथेरान : बातमीदार**

मे महिन्यातील शेवटच्या विकेंडला माथेरान पर्यटनस्थळ पर्यटकांनी फुलून गेले होते.सुट्ट्यांचा हंगाम आणि येथील आल्हाददायक वातावरणामुळे पर्यटकांची मोठी गर्दी याठिकाणी दिसत होती.मात्र दरवेळी सुट्ट्यांचा हंगामात माथेरान दस्तुरी नाका म्हणजेच टॅक्सी स्टँड आणि घाट रस्त्यात होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे पर्यटकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले.



माथेरान पर्यटनस्थळ मुंबई पुण्याच्या जवळचे ठिकाण असल्याने पर्यटकांकडून याला पहिली पसंती दिली जाते.सर्वाधिक पसंतीमिळत असलेल्या माथेरान पर्यटनस्थळी मे महिन्यातील शेवटचा विकेंड अगदी हाऊसफुल्ल झाला होता.शनिवार आणि रविवार येथे पर्यटक मोठ्या प्रमाणावर दाखल झाले होते.येथील जवळपास सगळेच हॉटेल्स आणि लॉज पूर्ण क्षमतेने भरले होते. सर्वांना येथे चांगला व्यवसाय मिळाला.

पण माथेरान दस्तुरी नाका,टॅक्सी स्टँड येथील वाहनतळात अपुरी पार्किंग व्यवस्था असल्याने पर्यटकांना मोठ्या समस्यांचा सामना करावा लागला.माथेरानला पर्यटनाच्या माध्यमातून सर्वांना रोजगार संधी उपलब्ध होत असतात.प्रवासी कर आणि वाहन कराच्या माध्यमातून नगरपालिका आणि वनविभागाला चांगल्या प्रकारे उत्पन्न मिळते.परंतु या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांना आवश्यक सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन स्तरावर आजमितीपर्यंत ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही.

जो पर्यटक या ठिकाणी आपल्या कुटुंबासोबत येतो त्यांना साधी वाहतुकीची व्यवस्था उपलब्ध होऊ शकत नाही ही फार लाजिरवाणी बाब असल्याचे वरिष्ठ मंडळींकडून बोलले जात आहे.मे महिन्यातील शेवटचा विकेंड येथे चांगलाच हाऊसफुल्ल होता.सर्वांना उत्तम व्यवसाय मिळाला मात्र वाहतूक कोंडीमुळे अनेक पर्यटकांचे याठिकाणी हाल झाले.यामुळे माथेरान पर्यटनस्थळाचा पर्यायी रस्त्याचा प्रश्न पुन्हा एकदा पुढे आला आहे.

**आम्ही रविवारी स्वतःच्या वाहनाने माथेरानला येत होतो.परंतुघाटात गाड्यांच्या प्रचंड गर्दीमुळे जवळपास दीड तास अडकून होतो. त्यानंतर हळूहळू दस्तुरी नाका येथे आलो असता तिथेही तीच परिस्थिती निदर्शनास आली.आम्ही आमची गाडी कुठे पार्क करावी हा प्रश्न निर्माण झाला.शेवटी नाईलाजाने आम्ही दस्तुरी नाका येथून पुन्हा घराकडे मार्गस्थ झालो.एक दिवसीयच पिकनिक करण्याचा बेत होता.केवळ पार्किंग व्यवस्था नसल्याने माघारी जावे लागल्यामुळे मुलांचा पुरता हिरमोड झाला.**

**-अनुप मढवी, पर्यटक, मुंबई**

# पेण तरणखोप गावच्या हद्दीत बांगलादेशी नागरिकांना अटक

**पेण : प्रतिनिधी**

पेण पोलीस ठाणे हद्दीतील तरणखोप गावच्या हद्दीत बांगलादेशी नागरिक असल्याची माहिती पेण पोलिसांनी मिळाली होती. त्यानुसार पेण पोलीसांनी या ठिकाणी छापा टाकून कारवाई केली. या ठिकाणी दोन बांगलादेशी नागरिक आपले वास्तव्य लपवून अनधिकृतपणे वास्तव्य करत असताना मिळून आले.

पेणमधील तारणखोप गावच्या हद्दीत बांगलादेशी नागरिक वास्तव्य करत असल्याची माहिती पोलिसांना मिळालीअसता या ठिकाणी छापा टाकून येथील नागरिकांची झडती घेतली असता येथे बांगलादेशी इसम १) जसिमोद्दीन अबुल कासिम काझी, वय ४९ वर्ष, २) लिली खातून खुरशीद अली, वय ४३ रा.मोहन सखाराम पाटील यांची चाळ, तरणखोप, ता.पेण, जि. रायगड, मूळ रा. नवारोन, पो. जादोबपुर, देश- बांगलादेश हे अनधिकृत वास्तव्य करीत असल्याचे आढळून आले त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.




ही कारवाई रायगड पोलीस अधिक्षक श्रीमती आंचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, पेण उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन टोम्पे यांच्या मार्गदर्शनाखाली पेण पोलीस निरीक्षक संदीप बागुल, सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश राजपूत यांच्या सूचनेनुसार पोलीस उपनिरीक्षक समद बेग, पोलीस उपनिरीक्षक प्रतीक पोकळे, पोहवा संतोष जाधव, पोहवा प्रकाश कोकरे, पोहवा सतीश पाटील, पोहवा अजिंक्य म्हात्रे, पोहवा/पेश वेळे, मपोहवा सुषमा भोईर, मपोहवा स्वरा पाटील, पोना अमोल म्हात्रे, पोशि तलवारे यांनी केली आहे

सदर बाबत पोलीस उपनिरीक्षक प्रतीक पोकळे यांनी पेण पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक समद बेग हे करत आहेत.

# श्रीवर्धनमध्ये मोकाट घोड्यांचा उच्छाद; शेतकऱ्यांसह नागरिक त्रस्त

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धनच्या पर्यटन व्यवसायावर घोडागाडी हे एक आकर्षण ठरत असले, तरी पर्यटन व्यवसाय मंदावल्याने घोडागाड्यांच्या देखभालीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सध्या अनेक घोडागाडी मालक पर्यटन बंद असल्याने आपल्या घोड्यांची जबाबदारी झटकून त्यांना मोकाट सोडत आहेत. याचा मोठा त्रास स्थानिक नागरिक, शेतकरी आणि बागायतदारांना सहन करावा लागत आहे.



मुख्य रस्त्यांपासून ते खाजगी बागायतींपर्यंत मोकाट फिरणाऱ्या घोड्यांमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः रात्रीच्या वेळेस हे घोडे मालकीच्या शेतांमध्ये घुसून पिकांची नासधूस करत आहेत. यामुळे पोटापाण्याचा भाजीपाला व्यवसाय करणारे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

श्रीवर्धनमधील अनेक पाखाड्यांमध्ये, मुख्य रस्त्यांवर, तसेच काही शासकीय कार्यालयांच्या परिसरातही हे मोकाट घोडे दिसून येत आहेत. त्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. शिवाय, सार्वजनिक ठिकाणी ही जनावरे अडथळा निर्माण करत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही उपस्थित झाला आहे.

घोड्यांसाठी स्वतंत्र निवाऱ्याची सोय, मालकांवर दंडात्मक कारवाई, तसेच पिकांचे नुकसान भरून देण्यासाठी यंत्रणा उभारली जाणे आवश्यक आहे. याशिवाय, पर्यटन हंगामात घोडागाडी व्यवसायासाठी काही नियमावली आखली गेल्यास, अशा समस्यांना रोखता येऊ शकते.

प्रशासनाकडून यावर्षी काही ठोस उपाययोजना केल्या जातात याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. नागरिकांनी आशावाद व्यक्त केला असला तरी प्रशासनाने याची गांभीर्याने दखल घेणे गरजेचे आहे.

# एक्स्प्रेस वेवर शिवशाही बसला अपघात; १३ प्रवासी जखमी

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील खालापूर टोलनाक्याजवळ पहाटे २.३० वा. पुणे लेनवर महाराष्ट्र राज्य महामंडळाच्या शिवशाही बसचा अपघातात१३ जण जखमी झाले जखमींमध्ये तीन लहान मुले, बसचा चालक व व वाहक जखमी झाले आहेत. बोईसर ते कोल्हापूर जाणाऱ्या बसची अज्ञात वाहनाला धडक बसली चालक पोटात स्टेअरींग घुसून गंभीर जखमीं झाला आहे

**पनवेल महानगरपालिका**

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

**जाहिर सुचना**

उप आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन विभाग), पनवेल महानगरपालिका हद्दीमध्ये Information, education and communication (IEC) activity करिता संस्थेची नेमणुक करणे या कामाचे अंदाजपत्रक बनविण्याकरीता बाजारभाव दरपत्रके मागविण्यात येत आहे. सदरबाबत अधिक माहिती महानगरपालिकेचे संकेतस्थळ panvelcorporation.com वर उपलब्ध आहे.

१) सीलबंद दरपत्रके दि. ०८/०६/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागात स्विकारण्यात येतील.

२) प्राप्त झालेली दरपत्रके शक्यतो दि. ०८/०६/२०२५ रोजी दुपारी ३.३० (शक्यतो) वाजता उपस्थित ठेकेदार यांच्या समक्ष उघडण्यात येतील.

३) अटी व शर्ती युक्त दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.


जा.क्र.पमपा/जनसंपर्क/३१२५/
प्र.क्र.२३९/२४१/२०२५
दिनांक :- ०२/०६/२०२५

सही/-
उप आयुक्त (आरोग्य)
पनवेल महानगरपालिका

# मंदिर आणि मशिदीच्या पावित्र्याप्रमाणे शाळेचेही पावित्र्य जपले पाहिजे -आमदार थोरवे

**कर्जत - प्रतिनिधी**

जसं आपण मंदिर आणि मशिदीचं पावित्र्य जपतो, तसंच शाळेचंही पावित्र्य प्रत्येकाने राखलं पाहिजे. ही फक्त शाळा नसून इथूनच उद्याचे जबाबदार नागरिक घडतात. आई वडिलांबरोबरच शाळेतील शिक्षकही आपल्यावर संस्कार करतात. त्या संस्कारांचा आपल्याला आयुष्यभर उपयोग होतो, असे प्रतिपादन आमदार महेंद्र थोरवे यांनी कर्जत येथे केले.




कर्जत तालुक्यातील नेरळ जवळील ममदापुर येथे साठ लाख रुपये खर्चून नव्याने उभारलेल्या उर्दू शाळेचे उद्घाटन आमदार महेंद्र थोरवे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. याप्रसंगी शिवसेना तालुका प्रमुख सुदाम पवळी, कर्जत खालापूर विधानसभा युवा सेना प्रमुख प्रसाद थोरवे, किसन शिंदे आदी उपस्थित होते. सुमारे शंभर वर्षांची परंपरा लाभलेली ही शाळा अनेक वर्षांपासून मोडकळीस आलेल्या अवस्थेत होती. विद्यार्थ्यांची संख्या असूनही मुलभूत सुविधा नसल्यामुळे अनेक पालकांनी शाळेकडे पाठ फिरवली होती. ही परिस्थिती लक्षात घेऊन आमदार महेंद्र थोरवे यांनी शाळेची प्रत्यक्ष पाहणी केली आणि तातडीने ६० लाख रुपयांचा निधी मंजूर केला.याप्रसंगी मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाचे सदस्य मौलाना सज्जाद नोमानी यांनी आमदार थोरवे यांचे कौतुक केले.

# महाडमध्ये पुन्हा अपघात; सात प्रवासी जखमी

**महाड : प्रतिनिधी**

महाड-दापोली रस्त्यावर रेवतळे आंग्रे कोंडजवळ दापोली-पुणे शिवशाही बस निसरड्या रस्त्यावरून घसरून झालेल्या अपघातात ७ प्रवासी जखमी झाले असून उर्वरित २९ प्रवासी बस रस्त्याच्या बाजूला झाडावर आढळल्याने दैव बलवत्तर म्हणून प्रवासी वाचले



याबाबत अधिक माहिती अशी की दापोली आगारातून सकाळी ८.३०च्या सुमारास दापोली-पुणे ही शिवशाही बस रेवतळे आंग्रे कोंड या ठिकाणी आली असता समोरून येणाऱ्या खाजगी कारला वाचवण्याच्या प्रयत्नात बस चालकाने ब्रेक मारला असता गाडी रस्त्यावरील झाडाला जाऊन आदळली व पूर्ण बस रस्त्याच्या बाजूला असणाऱ्या गटारामध्ये जाऊन अडकली

या बसमधून ३१ प्रवासी प्रवास करीत होते यातील दोन प्रवाशांना गंभीर स्वरूपाची दुखापत झाल्याने त्यांना महाड ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले आहे या तीव्र उतार असलेल्या रस्त्यांवर सातत्याने अपघात होत असल्याने हा मार्ग चर्चेत आला आहे. या मार्गावर उपाययोजना करण्यासाठी काही ठिकाणी निसरडा रस्ता ठरवण्यात खरडवण्यात आला. मात्र यामुळे रस्त्याचे नुकसान होणार आहे. वाहनचालकांनी देखील रस्त्याच्या परिस्थितीकडे लक्ष देऊन वाहन चालवले पाहिजे अशा प्रकारचा सल्ला अधिकाऱ्यांकडून दिला जात आहे.

**Wanted Teachers**

**Wonderland School, Kharghar**

Managed by Archana Charitable Trust
G-60, 31-32, Sector 12, Kharghar

**Wanted Teachers - Primary & Secondary Section**

1. **English Teacher** - B.A./M.A. B.Ed.
2. **Mathematics Teacher** - B.Sc./M.Sc. B.Ed.
3. **Science Teacher** - B.Sc./M.Sc. B.Ed.

Apply with latest resume and and passport size photo on
wonderlandkharghar@gmail.com
Also on Whatsapp No. **8454843726**

# वाढदिवस अभीष्टचिंतन...!



